# महासागर यवतमाळ

सोमवार,२३ जून २०२५

पान ३


## तोतया पोलिसांनी व्यावसायिकाला घातला गंडा

**यवतमाळ:** शहरातील वर्दळीच्या जाजू चौक येथे शनिवारी सकाळी ९ वाजता तोतया पोलिसांनी व्यावसायिकाला गंडा घातला. पोलिस असल्याची बतावणी करीत अंगझडतीच्या बहाण्याने त्यांच्या गळ्यातील सोन्याचा गोफ, बोटातील अंगठ्या काढून घेतल्या. हा प्रकार लक्षात आल्यानंतर व्यावसायिकाने अवधूतवाडी पोलिस ठाण्यात तक्रार दिली. गजानन वासुदेव डवले रा. परोपटे ले-आऊट मोक्षधाम वडगाव हे कॅरिबॅग सेलींगचे काम करतात. जाजू चौक परिसरात फिरत असताना त्यांना हेल्मेट घातलेल्या व तोंडाला मास्क बांधलेल्या युवकाने पोलिस असल्याची आयडी दाखवून त्यांच्या अंगाची झडती घेतली. सोन्याची अंगठी पाच ग्रॅम व १३ ग्रॅमची सोन्याचे चेन असा ९१ हजारांचा मुद्देमाल हातचलाखीने काढून घेत पळ काढला, असे तक्रारीत नमूद केले आहे.

# जिल्ह्यातील १० नगर परिषदांच्या निवडणूक प्रक्रीयेला आला वेग

### ▪ प्रभाग रचनेसह सदस्य संख्या वाढणार?

**यवतमाळ, दि.२२, महासागर प्रतिनिधी:** राज्यातील नगर परिषदा,महानगर पालिकांच्या निवडणुकांची तयारी शासनाने सुरू केली असुन प्रभाग रचनेचा कार्यक्रम जाहिर करण्यात आला होता. त्यानुसार जिल्ह्यात सर्व १० नगर पालिकांअंतर्गत प्रशासनाने नव्या प्रारूप प्रभागरचनेचे का सुरू केले आहे. त्यात पुढे येणाऱ्या लोकसंख्येच्या आकडेवारीनुसार जिल्ह्यात १० नगर पालिकांमध्ये पुर्वीच्या तुलनेत सुमारे १३ प्रभाग आणि त्या प्रमाणात साधारणतः २४ सदस्य वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. रखडलेल्या नगर पालिकांच्या निवडणुकांना आता न्यायालयाच्या आदेशाने हिरवी झेंडी मिळणार आहे. त्यातच राज्य शासनाने प्रारुप प्रभाग रचना तयार करण्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या होत्या. त्या आदेशापाठोपाठ १२ जून रोजी प्रारुप प्रभागरचनेचा कालबद्ध कार्यक्रमही जाहीर करण्यात आला आहे.

त्या आदेशानंतर जिल्ह्यातील यवतमाळ, नेर, दारव्हा, दिग्रस, पुसद, उमरखेड, आर्णी, घाटंजी, वणी आणि पांढरकवडा या १० नगर पालिकांच्या नव्या प्रारूप प्रभागरचना सुरू करण्यात आली. या प्रभाग रचनेसंदर्भातील कार्यक्रमानुसार २३ ते २६ जून दरम्यान गुगल मॅपवर प्रभागाचे नकाशे तयार करणे, १७ ते ३० जून नकाशावर निश्चीत केलेल्या प्रभाग हद्दी जागेवर जावून तपासणे, १ ते ३ जुलैला प्रारुप प्रभाग रचनेच्या मसुद्यावर समितीने स्वाक्षऱ्या करणे, ४ ते ८ जुलै प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव राज्य निवडणूक आयोगास पाठवणे, १५ ते २१ जुलै राज्य निवडणूक आयोगाने प्राधीकृत केलेल्या अधिकाऱ्याने प्रारुप प्रभाग रचनेस मान्यता देणे, प्रारुप प्रभाग रचना प्रसिद्ध करणे व त्यावर हरकती सूचना मागवणे, २२ ते ३१ जुलै जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने प्राप्त सुचना व हरकतींवर सुनावनी घेणे, १ ते ७ ऑगष्ट सुनावनीनंतर हरकती व सुचनांवरील शिफारशी विचारात घेवुन प्राधिकृत अधिकाऱ्यांनी अंतीम केलेली प्रभाग रचना निवडणूक आयोगास मान्यतेसाठी पाठवणे, - २२ ऑगष्ट ते। सप्टेंबर दरम्यान राज्य निवडणूक आयुक्तांनी मान्यता दिलेली प्रभाग रचना संबंधीत मुख्याधिकारी यांना कळवणे, राज्य निवडणूक आयुक्त यांनी अंतिम केलेली प्रभाग रचना अधिसुचनेद्वारे प्रसिद्ध करणे ही कारवाई करावी लागणार आहे. जिल्ह्यातील १० नगर पालिकांमध्ये कमी-



अधीक काळापासून प्रशासक नेमण्यात आले असून ते सर्व कारभार पाहत आहेत. जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या यवतमाळ नगर पालिकेमध्ये प्रशासक नेमून ३ वर्षे लोटली असून चौथे वर्ष सुरू आहे. असे असताना अद्यापपर्यंत निवडणुका न झाल्याने नागरिकांची अनेक काम खोळंबून राहत असल्याची ओरड पालिकेच्या माजी सदस्यांकडून करण्यात येत आहे. मात्र आता निवडणूक होण्याचे चिन्ह दिसत आहे. संबंधीत पालिका प्रशासनाने समिती गठीत करुन काम सुरू केले आहे. त्यामध्ये २०२२ मध्ये तयार करण्यात आलेल्या प्रभागरचनेनुसार आता नव्याने प्रभागरचना होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. तसे झाल्यास सर्व १० नगर पालिकांमध्ये मिळून पूर्वी असलेल्या १२३ प्रभागांच्या ऐवजी आता १३६ प्रभाग निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यासोबतच पूर्वी असलेल्या पालिका सदस्य संख्या २४९ वरून २७३ होण्याची शक्यता आहे.

## पालकमंत्री संजय राठोड यांच्याहस्ते ई-बसेसचे लोकार्पण

### ▪ यवतमाळ व दारव्हा आगारास प्रत्येकी ५ बसेस





**यवतमाळ, दि.२२, महासागर प्रतिनिधी:** यवतमाळ आगारास तीन नवीन शिवाई या वातानुकूलित अद्ययावत ई-बसेस व दारव्हा आगारास पाच नवीन लालपरी बस प्राप्त झाल्या. या बसेसचे लोकार्पण आज पालकमंत्री संजय राठोड यांच्याहस्ते यवतमाळ आगाराच्या आवारात करण्यात आले. यावेळी पालकमंत्र्यांसह आ.बाळासाहेब मांगूळकर, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक हेमराज कच्छवा, आगार व्यवस्थापक जावेद खान, हरीष थोरात, पराग पिंपळे, हरीहर लिंगनवार, राजुदास जाधव, इलेक्ट्रॉनिक बस आगार व्यवस्थापन प्रतिक पवार, निरिक्षक श्री. चव्हाण, यंत्र अभियंता नरसिंग चव्हाण, विभागीय वाहतूक अधिकारी दादाराव दराडे, वाहतूक निरीक्षक हरीष थोरात आदी उपस्थित होते.

पालकमंत्री संजय राठोड यांच्या पुढाकाराने जिल्ह्यातील सर्व आगारास यापूर्वी प्रत्येकी १० नवीन बसेस प्राप्त झाल्या होत्या. आता नव्याने यवतमाळ बस आगारास पाच अत्याधुनिक शिवाई या वातानुकूलित इलेक्ट्रॉनिक बसेस उपलब्ध झाल्या. त्यापैकी आगारास प्राप्त तीन बसेसचे लोकार्पण आज झाले. दोन इलेक्ट्रॉनिक बसेस लवकरच उपलब्ध होणार आहे. सोबतच दारव्हा आगारास पाच नवीन लालपरी प्राप्त झाल्या असून या बसेसचे लोकार्पण देखील पालकमंत्र्यांनी फित कापून केले व बसेस प्रवाशांच्या सेवेत दाखल केल्या. यावेळी पालकमंत्री व आ.बाळासाहेब मांगूळकर यांनी बस व बसमधील सुविधांची पाहणी केली.

## सेंट्रल बँकेने शेतकऱ्यांचे खाते गोठविले

### ▪ स्वप्निल नाईक यांचे बँकेच्या मुख्यालयात निवेदन

**महागाव, दि.२२, महासागर प्रतिनिधी:** तालुक्याअंतर्गत येत असलेल्या फुलसावंगी येथील सेंट्रल बँकेच्या मनमानी कारभाराला सर्व सामान्य नागरिकांसह शेतकरी वैतागले आहेत. सेंट्रल बँक शाखा व्यवस्थापकाने अनेक शेतकऱ्यांची खाते गोठविली आहे. त्यामुळे त्यांच्या खात्यातून पैसे निघत नाही. परिणामी शेतकऱ्यांमधून संतापाची लाट उसळली असून याबाबत काँग्रेसचे स्वप्निल नाईक यांनी मुंबई येथील सेंट्रल बँकचे मुख्यालयामध्ये निवेदन देऊन सदर खाती सुरू करण्याची मागणी केली आहे. फुलसावंगी येथे सेंट्रल बँकेची शाखा आहे. या बँकेमध्ये फुलसावंगीसह राहुर, शिरफुली, शिरमाळ, चिल्ली, चिंचोली, दगडथर, पिंपळगाव, वरोडी टेंभी व काळी येथील हजारो शेतकऱ्यांची खाते आहेत. काही शेतकऱ्यांकडे या बँकेचे कर्ज आहे. बहुतांश शेतकऱ्यांनी शासनाला विकलेल्या शेतमालाचे पैसे तसेच इतर योजनेचे पैसे हे त्यांच्या खात्यात जमा झाले आहेत. परंतु शाखा व्यवस्थापकांनी पहिले कर्ज भरा, नंतर तुमचे पैसे मिळतील असे आडमुठे धोरण अवलंबवून अनेकांची खाते होल्ड मारली आहेत. त्यामुळे शेतकरी अडचणीत आला आहे. त्यांच्या बचत खात्यातून पैसे निघत नाही आहेत. सद्यस्थितीला पेरणीचा हंगाम सुरू झाला आहे. शेतकऱ्यांची लागवडीसाठी पैसे जुळविण्यासाठी धावपळ सुरू आहे. अशातच बँक व्यवस्थापकाने आडमुठे धोरण स्वीकारल्यामुळे शेतकरी मेटाकुटीस आला आहे. त्यामुळे शेतकरी सावकाराच्या पाशात अडकण्याची शक्यता आहे. शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण वाढण्याची शक्यताही नाकारता येत नाही. त्यामुळे शासनाने या गंभीर बाबीचा विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. तसेच सदर खाती त्वरित सुरू करण्याची मागणी केली आहे.

## बाजार समितीतून हमालांनीच लांबवले चक्क सोयाबीनचे कट्टे



**यवतमाळ, दि.२२, महासागर प्रतिनिधी:** हमालांनीच बाजार समितीतील सोयाबीनचे कट्टे लांबवल्याचा धक्कादायक प्रकार बाजार समितीतील सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झाला आहे. या प्रकरणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव राजू कुंभरे यांनी शनिवार, दि. २१ जून रोजी शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. या प्रकरणी रोहितकुमार अशोक रॉय (३०), नितीषकुमार प्रधान मुनी (२३), प्रधान सुगल मुनी (५३), शिवशंकर सफरदेव मुखीया (४०), हर्षीतकुमार नसीबलाल राय (४९) शाम तेगो मुनी (४५), जनार्दन सेलकर अशी ताब्यात घेण्यात आलेल्या सात जणांची नावे आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनूसार, यवतमाळ कृषी उत्पन्न बाजार समितीचे परवानाधारक व्यापारी श्याम सुंदर अग्रवाल यांनी शुक्रवारी शेतकऱ्यांच्या सोयाबीनची खरेदी केली होती. त्यानंतर सोयाबीनचे कट्टे वाहनात भरण्याच्या सूचना हमाल रोहितकुमार अशोक रॉय यांना दिल्या होत्या. मात्र शनिवारी हमालांनी मिळून सोयाबीनचा पाला करून तयार ठेवला होता. त्यानंतर कमला ट्रेडिंग कंपनीचे आदित्य शामसुंदर अग्रवाल यांनी सोयाबीनचे कट्टे भरलेला ट्रक क्रमांक (एमएच-२९-बीई ५५८६) वजनकाट्यावर नेला. कट्ट्याचे वजन ३०२.७० क्विंटल होते. यात पाच क्विंटल सोयाबीनची तफावत निर्माण झाली होती. सीसीटीव्हीची पाहणी केली असता सात कट्टे चोरी करून ओटा क्रमांक सातवर थप्पी लावून ठेवल्याचे निदर्शनास पडले. या प्रकरणी पोलिसांनी सातही आरोपींविरोधात चोरीचा गुन्हा नोंद केला आहे. पुढील तपास शहर ठाणेदार रामकृष्ण जाधव हे करीत आहेत.

## दहशत पसरविणाऱ्या दोन्ही गुंडांना पोलीस कोठडी

**बाभूळगाव, दि.२२, महासागर प्रतिनिधी:** धारदार चाकूच्या जोरावर येथील छत्रपती शिवाजी चौकातील घरावर दिवसा सशस्त्र हल्ला करणाऱ्या दोन्ही आरोपींना पोलिसांनी बेड्या ठोकल्या असून दिनांक २५ जून २०२५ पर्यंत दोघांचा पोलीस कस्टडी रिमांड घेतला आहे. कोणत्याही परिस्थितीत गुंडगिरी खपवून घेतली जाणार नाही असे या वेळी ठाणेदार एल. डी. तावरे यांनी सांगितले. भाड्याने दिलेला ट्रॅक्टर परत मागितल्याच्या कारणावरून वैभव उर्फ जहरीला अंबादास जांभुळकर व विशाल उर्फ पच्चीस अरुण रायबर दोघेही राहणार इंदिरानगर बाभूळगाव यांनी एजाज अली मोहम्मद अली यांच्याकडून ट्रॅक्टर भाड्याने घेतला होता.



सदर ट्रॅक्टर परत मागितला असता तिघेजण एकाच मोटर सायकलवर त्यांच्या घरासमोर आले. एक जण बाहेर थांबला व वरील दोन्ही सराईत गुन्हेगारांनी एजाज अली यांच्या घरात घुसून चाकूच्या जोरावर धुमाकूळ घातला आणि ट्रॅक्टर परत देणार नाही पेटवून टाकीन अशी धमकी दिली. यानंतर दोघांनी आपल्या जवळ कमरेला खोचून असलेला एक सव्वा फुटाचा काटा वाला धारदार चाकू बाहेर काढला. एजाज अली यांच्या पोटात खूपसणार तेवढ्यात प्रसंगावधान राखून त्यांच्या पत्नीने पतीला बाजूला करीत दोघांनाही घरा बाहेर जाण्याचे सांगून लगेच घराचे दार बंद केले चिडलेल्या दोघांनी दरवाजाला लाथा मारीत शिवीगाळ करीत जोर जोराने ओरडून दार तोडण्याचा प्रयत्न केला. घराच्या आत मधून पती-पत्नी दोघेही दरवाजा लोटून होते. दार तुटत नसल्याचे पाहून दोघांनी बाहेरून लावलेला कुलर जमिनीवर पडला त्या कुलरवर नाचले व कुलर पूर्णपणे तोडून टाकला. हा थरार जवळपास ४० मिनिटे सुरू होता. पोलीस ताफा घटनास्थळी पोहोचला. तोपर्यंत आरोपी तेथून पसार झाले होते. आरोपी वैभव उर्फ जहरीला अंबादास जांभुळकर यांच्या विरुद्ध बाभूळगाव पोलीस स्टेशनच्या अभिलेखावर वेग वेगळे १५ गुन्हे दाखल आहे.

तर विशाल उर्फ पच्चीस अरुण रायबर याचे विरुद्ध सहा गुन्हे दाखल आहे.दोन्ही आरोपी ( ड ) प्रवृत्तीचे असल्याचे निष्पन्न झाले.त्यानंतर दोन्ही आरोपी पोलिसांच्या तावडीत सापडले. ही कार्यवाही पोलीस निरीक्षक एल.डी. तावरे, विजय लोखंडे, निलेश भुसे, नितेश छापेकर यांनी केली. भर चौकात दिवसा धुमाकूळ घालून खून करण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोघांना न्यायालयाने दिनांक २५ जून पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

## बंदुकीच्या धाकावर धाडसी दरोडा टाकणाऱ्यांवर मोका

**दारव्हा, दि.२२, महासागर प्रतिनिधी:** शहरातील गजबजलेल्या ठिकाणी दरोडेखोरांनी एका किराणा व्यवसायिकाच्या घरावर सशस्त्र दरोडा टाकला होता. त्या प्रकरणातील दरोडा टाकणाऱ्या टोळीवर मोका लावण्यात आला असून त्या आरोपींना पुन्हा पोलिस कोठडी होणार आहे. आलिशान चार चाकी वाहनाने आलेल्या दरोडेखोरांनी डोळ्यावर पट्टी बांधून हात पाय बांधले त्यानंतर घरातील मौल्यवान वस्तूसहित रोख रकमेवर डल्ला मारला यात चार लाख रुपये रोख २५ तोळे सोने, दोन किलो चांदी असा मुद्देमाल लुटून दरोडेखोर चार चाकीने प्रसार झाले होते. गणेश



काळबांडे रा. राम मंदिर जवळ बारीपुरा दारव्हा असे किराणा व्यवसायिकाचे नाव असून त्यांचे अतिशय जुने किराणा प्रतिष्ठान आहे. काळबांडे जेवण्याकरिता एक वाजताच्या सुमारास घरी आले असता ही घटना उघडकीस आली होती. पोलिस मागावर असल्याची भनक लागल्याने दरोडेखोरांनी आपले चार चाकी वाहन शेबाळपिंप्रि शिवारात सोडून शेतातून प्रसार होण्याच्या प्रयत्न करत असता खंडाळा पोलिसांनी पाच किलोमीटर पाठलाग करत दरोडेखोरांना जेरबंद केले होते. आरोपींपासून एक बंदूक एक बॅग असे साहित्य जप्त करण्यात आले सर्व आरोपी नांदेड येथील असल्याचे उघडकीस आले होते.

## मनसे लोकल ऑटो युनियनची स्थापना



**उमरखेड, दि.२२, महासागर प्रतिनिधी:** रिक्षा चालक हा समाजाचा घटक असून त्यांना सन्मानाने जगता यावे म्हणून दि. २२ रोजी येथील शासकीय विश्रामगृहावर महाराष्ट्र नवनिर्माण सेना लोकल ऑटो युनियनची स्थापना मनसेचे संजय बिजोरे यांच्या नेतृत्वात ही संघटना स्थापित करण्यात आली. या मनसे लोकल ऑटो युनियनचे अध्यक्षपदी राजू कोथळकर, उपाध्यक्ष सोनू गडदे व श्याम सुरोशे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली . यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनाचे उपजिल्हाध्यक्ष डेविड शहाणे ,संदीप कोकाटे, लक्ष्मण भांगे ,अमोल लामटिळे, आशिष वाकोडे, दीपक डोंगरे यासह अनेक महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पदाधिकारी उपस्थित होते .

## उमरखेडमधील पेट्रोल पंप हटवण्यासाठी उपोषण

**उमरखेड, दि.२२, महासागर प्रतिनिधी:** श्री. छत्रपती शिवाजी महाराज चौकातील भारत पेट्रालियम (पेट्रोल पंप) यांना शासनाने मंजुर केलेल्या जागे व्यतिरीक्त त्यांनी केलेले नियमबाहय अतिक्रमण तात्काळ रिकामे करावे तथा भारत पेट्रोलियमची लिज जुन महिण्यात संपत असल्यामुळे त्यांना लिज वाढवून देण्यात येऊ नये यासाठी श्री. छत्रपती शिवाजी महाराज अश्वारुढ पुतळा कृती समितीचे उपाध्यक्ष गजानन देशमुख यांनी दि. १८ जूनपासून आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे.

उमरखेड शहरामध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग व नगर पालिका प्रशासन यांनी संयुक्तपणे उमरखेड शहरातील रस्त्यालगत असलेले अतिक्रमण पुर्णपणे काढले.

परंतु भारत पेट्रोलियम यांचे अतिक्रमण काढले नाही. त्यांना शासनाने जेवढ्या जागेची लिज मंजुर केली होती. त्या जागेव्यतिरीक्त त्यांनी शासनाच्या जागेमध्ये अतिक्रमण करुन ताबा केला आहे. ते अतिक्रमण तत्काळ काढून जागा मोकळी करुन देण्यात यावी. श्री छत्रपती शिवाजी महाराजांचा आश्वारुढ पुतला सदर पेट्रोलपांपाच्या मागे असल्यामुळे तमाम महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेले छत्रपती शिवाजी महाराज याचा अश्वारुढ पुतळा आडगळीत असल्यासारखा वाटतो. सदर ज्वलनशिल पदार्थामुळे भविष्यात त्या चौकात अघटीत घटना घडल्यास संपूर्ण महाराष्ट्रात तणावाचे वातावरण निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा घटना यापूर्वी घडल्या होत्या. त्यामुळे उमरखेड शहरातील व तालुक्यातील शिवभक्तांमध्ये प्रचंड चीड आहे.

त्यामुळे त्याचा उद्रेक होऊ नये म्हणून सदर पेट्रोल पंपाचे अतिक्रमण काढल्यास व त्या पेट्रोल पंपाची लिज वाढवून न दिल्यास सदर पुतळा दर्शनीय भागात येईल. म्हणून जिल्हाधिकारी यांनी लिज असलेल्या जागे व्यतिरिक्त असलेले 'सदर पेट्रोलपंपाचे अतिक्रमण तत्काळ काढून टाकावे. अशी मागणी गजानन देशमुख यांनी केली आहे.

## अवैध दारू विक्री करणाऱ्या दोघांना अटक



**दारव्हा, दि.२२, महासागर प्रतिनिधी:** तालुक्यात अवैध दारू विक्रीला आळा घालण्यासाठी पोलिसांनी कारवाई सुरू केल्याचे चित्र आहे. दि. २० जूनला मांगकिन्ही येथे पोलिसांनी टाकलेल्या धाडीत दोन आरोपी, पवन जीवन जाधव आणि प्रवीण बाबाराव गव्हाणे, यांना अटक करण्यात आली. त्यांच्याकडून १०,००० रुपयांच्या देशी-विदेशी दारूचा साठा जप्त करण्यात आला. ही कारवाई प्रभारी पोलीस उपनिरीक्षक निखिल कोरपे यांच्या नेतृत्वाखाली जमादार घोडाम, पो. कॉ. राम मस्के, विलास राठोड आणि अंजली कवचट यांच्या पथकाने यशस्वी केली. या प्रकरणी फिर्याद दाखल करण्यात आली आहे. पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, गावात असे प्रकार आढळल्यास त्वरित माहिती द्यावी. माहिती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवण्याचे आश्वासनही पोलिसांनी दिले आहे. मांगकिन्ही परिसरातील नागरिकांनी या कारवाईचे स्वागत करताना समाधान व्यक्त केलेआहे.

## सामाजिक कार्यकर्ते निवृत्त अधिकारी गोपाल आडे यांचा शिवसेनेत प्रवेश

**यवतमाळ, दि.२२, महासागर प्रतिनिधी:** जिल्ह्यातील राळेगाव विधानसभा मतदार संघातील वाढोणाबाजारचे रहिवासी व माध्यमिक शिक्षण बोर्डातील निवृत्त अधिकारी सामाजिक कार्यकर्ते गोपाल आडे यांनी यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री ना. संजय राठोड यांच्या उपस्थितीत आज शिवसेनेत प्रवेश केला. शिवसेनाप्रमुखांचे विचार व पक्षाचे मुख्य नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच यवतमाळ



जिल्ह्याचे पालकमंत्री ना. संजय राठोड यांच्या कार्याने प्रेरित होऊन राळेगाव मतदार संघातील सामाजिक कार्यकर्ते उच्च विद्या विभूषित गोपाल आडे यांनी समाजकारण करण्याकरता जिल्हा नेतृत्वाच्या मार्गदर्शनात शिवसेनेत काम करण्याची इच्छा व्यक्त केली. त्यांच्यासोबत मधुकर लील्लारे सरपंच शरद, अमोल रामटेके उपसरपंच, रामभाऊ धनस्कर, संजय पवार सरपंच खैरी, प्रेम आडे, तुलसीदास वाईकर संजय निनावे व शेळी, खोरद मोहदरी येथील कार्यकर्ते यांनी सुद्धा शिवसेनेत प्रवेश केला. याप्रसंगी शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख हरिहर लिंगनवार, जिल्हाप्रमुख श्रीधर मोहोड, माजी जिल्हा प्रमुख पराग पिंगळे, राजुदास जाधव, गजानन डोमाळे, यशवंत पवार गणेश गावंडे इत्यादी उपस्थित होते.

## भरधाव ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

**दिग्रस, दि.२२, महासागर प्रतिनिधी:** पुसद येथून भरधाव वेगात येणाऱ्या ट्रकने दिलेल्या धडकेत तरुण घटनास्थळीच ठार झाला. ही घटना शुक्रवारी सायंकाळी सहा वाजता दरम्यान सिंगद येथे घडली. सुदर्शन मधुसूदन ढगे (२७) रा. सिंगद, असे मृत तरुणाचे नाव आहे. सुदर्शन एमएच २९ एबी २९३१ ने दिग्रसकडे जात असताना पुसद येथून भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रक (एमएच १२ एफ झेड ८७४५) ने धडक दिली. या अपघातात गंभीर जखमी झाल्याने तरुणाचा मृत्यू झाला. अपघात घडताच ट्रक चालकाने स्वतःला पोलिसांच्या स्वाधीन केले. दिग्रस पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात ग्रामीण पाठविला. शवविच्छेदनानंतर मृतदेह नातेवाइकांच्या ताब्यात देण्यात आला. मृताच्या पश्चात आई, वडील, पत्नी, एक मुलगी आहे. ट्रक चालकाविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## मोझर येथे कृषी विभागाची कार्यशाळा

**नेर** : तालुका कृषी अधिकारी कार्यालय, कृषी विज्ञान केंद्र सावंगी रेल्वे आणि कृषी महाविद्यालय दारव्हा यांच्या वतीने विकसित कृषी संकल्प अभियानांतर्गत गट कार्यशाळा घेण्यात आली. सरपंच वंदना चव्हाण अध्यक्षस्थानी होत्या. डॉ. विपुल वाघ, मयूर इंगोले, उपकृषी अधिकारी सूरज इंगोले, प्रतीक्षा नवले, मंडळ कृषी अधिकारी प्रशांत जोल्हे यांनी मार्गदर्शन केले. कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांसमक्ष सोयाबीन बियाणे उगवण क्षमता प्रात्यक्षिक घेतले. कृषिसेवक ज्योतिका पत्रे यांनी प्रास्ताविक केले. समीर भेराणे यांनी आभार मानले. याप्रसंगी सहायक कृषी अधिकारी धीरज धनस्कर, शहाजी शिंदे, नीलेश पचगाडे, सुभाष कांबळे, शीला गुंठे, पूजा बघेले, लक्ष्मी चव्हाण, अमन सवाई, नेहा वानखडे, पूनम ढोमने, विलास सरवदे आदी उपस्थित होते.

# पुसद विभाग आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत शासनाचे दुर्लक्ष

- प्रदेशाध्यक्ष अविनाश पंधरे यांचा आरोप
- उमरखेड येथील पत्रपरिषदेतून धोरणांवर टीका



**उमरखेड , दि.२२, महासागर प्रतिनिधी:** पुसद विभागात योजनांची अंमलबजावणी ठप्प आहे. पायाभूत सुविधा आणि प्रत्यक्ष विकास थांबलेला आहे. पुसद विभाग आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत शासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अविनाश पंधरे यांनी केला.

२१ मे रोजी शासकीय विश्रामगृह उमरखेड येथे अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद व युवा परिषद विदर्भ शाखेच्या वतीने पत्रपरिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आदिवासी समाजावरील अन्याय, योजनांची अपयशी अंमलबजावणी, आणि शासनाच्या ढिसाळ धोरणांवर सडकून टीका करीत ते पुढे म्हणाले की, आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय शासकीय योजनांचा लाभ खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवतच नाही. निधी हा आदिवासी पाड्याऐवजी ठेकेदार, अधिकारी आणि त्यांची संघटना यांच्यात विभागला जातो.

परिणामी, योजनांचा मूळ उद्देशच हरवतो आहे. घरभत्त्याचा गैरवापर आश्रमशाळांमध्ये अनागोंदी कारभार चालत असल्याचे सांगितले. आश्रमशाळांतील शिक्षक शासनाकडून मिळणाऱ्या घरभत्त्याचा गैरवापर करत आहेत. आदिवासी विकासाचा ३३५ कोटींचा निधी 'लाडक्या बहिणी' योजनेत शासनातील राज्यकर्त्यांनी वळविला असून आदिवासीमंत्र्यांचे याबाबत मौन संशयास्पद असल्याची टीका त्यांनी केली.

येथील विविध समस्यांबाबत जुर्ले महिन्यात आदिवासी युवा बांधवांना सोबत घेऊन पायदळ मोर्चा उमरखेड - पुसद येथील आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयावर काढणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

आदिवासी भरतीत समाजाला डावलल्या जात असल्याची उदाहरणे यावेळी त्यांनी दिली. वसतिगृ व शाळांची दयनीय स्थिती असून केवळ कागदोपत्री योजनांचे गाजर दाखविल्या जाते असल्याचा आरोप त्यांनी केला शाळा व वसतिगृहांमध्ये विद्यार्थ्यांना मुलांना ना सकस आहार मिळतो, तो पुरविला जात नाही. संघटनेच्या माध्यमातून या विषयी मुख्यमंत्र्यांना प्रत्यक्ष भेटून माहिती दिली असता त्यांच्या कडुन सकारात्मक असा प्रतिसाद मिळत नसल्याने संतपा व्यक्त केला.

या पत्रकार परिषदेला अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद अकोला जिल्हा संघटक वैजनाथ ऊईके आणि तालुकाध्यक्ष ओमप्रकाश किरवले कोरटाकर यांची उपस्थिती होती.

# जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन

**यवतमाळ, दि.२२, महासागर प्रतिनिधी:** राष्ट्रीय व राज्य विधीसेवा प्राधिकरणाच्या निर्देशान्वये प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधीसेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष नागेश न्हावकर यांच्या मार्गदर्शनाखाली दि.१३ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व न्यालयांमध्ये ही लोकअदालत होणार आहे. पक्षकारांनी आपली प्रलंबित व दाखलपुर्व जास्तीत जास्त प्रकरणे आपसी तडजोडीसाठी ठेवावी, असे आवाहन करण्यात आले आहे. सदर राष्ट्रीय लोकअदालत जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व जिल्हा वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा न्यायालय तसेच जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालये, कामगार न्यायालय व औद्योगिक न्यायालय, कौटुंबिक न्यायालय, ग्राहक तकार निवारण मंच आणि इतर सर्व न्यायालये तसेच न्यायाधिकरणे येथे होणार आहे. या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये न्यायालयात प्रलंबित असलेली तडजोडीस पात्र दिवाणी व फौजदारी प्रकरणे, मोटार अपघात नुकसान भरपाई, भुअर्जन मामले, महसुली प्रकरणे, वैवाहिक संबंधातील वाद, बँका व अन्य वित्तीय संस्थांचे नुकसान व वसुली प्रकरणे व तडजोडीस पात्र असणारी सर्व प्रलंबित व दाखलपूर्व प्रकरणे आपसी तडजोडीने निकाली निघणार आहे. लोकअदालतीमध्ये वाद मिटविण्याकरीता न्यायाधीश, तज्ञ वकील व सामाजिक कार्यकर्ते यांचे मंडळ पक्षकारांस मदत करतील. लोकअदालतीमध्ये प्रकरण ठेवण्यासाठी कोणत्याही प्रकारची फी नाही. लोकअदालतीच्या निवाड्याविरूध्द अपील नसल्याने वाद कायमचा मिटतो. न्यायालयाच्या हुकुमनाम्या प्रमाणे लोकअदालती मध्ये होणाऱ्या निवाड्याची अंमलबजावणी न्यायालयामार्फत करता येते. खटल्यांमध्ये साक्षी पुरावा, उलट तपासणी, दिर्घ युक्तीवाद याबाबी टाळल्या जातात. वाद मिटविल्याने वेळ व पैशाची बचत होते. तसेच प्रकरण न्यायालयात चालविण्या करीता होणाऱ्या त्रासातुन सुटका होते व त्वरीत आपसी संमतीने न्याय मिळतो.

पक्षकारांनी आपली प्रकरणे दिनांक १३ सप्टेंबर रोजी आयोजित राष्ट्रीय लोकअदालतमध्ये ठेवण्याकरीता प्रलंबित प्रकरणांसाठी संबंधित न्यायालयात अर्ज सादर करावा आणि दाखलपूर्व प्रकरणांसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तसेच तालुका विधी सेवा समितीच्या कार्यालयाशी संपर्क साधून जास्तीत जास्त प्रकरणे आपसी तडजोडीने मिटवावीत, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव दिपक दाभाडे, जिल्हा वकील संघाचे संजय जैन यांनी केले आहे.

# देवा आमचा नवस बोलून बळी घ्या

- १९ वन मजुरांनी मुख्यमंत्र्यांना हमी पत्रातून केली आग्रही मागणी

**पुसद, दि.२२, महासागर प्रतिनिधी:** वन कामगारांना कायम करण्यासाठी गेल्या ३० वर्षांपासून मागणीचा लढा सुरू आहे. त्यांच्या मागणीला संबंधित खात्याच्या मंत्र्यांसह विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत आहे. वेळोवेळी उपोषण आंदोलन व अधिवेशनात मुद्दे देखील मांडली होते. आता हताष झालेल्या वन कामगारांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना शेवटचे पत्र व्यवहार करून आमचा नवस बोलून बळी घेण्याचे हमीपत्र दि. १२ जून रोजी राज्य सरकारी चतुर्थ श्रेणी कर्मचारी मध्यवर्ती महासंघाचे जिल्हाध्यक्ष रमाशंकर शुक्ला यांच्यासह १८ जणांनी दिले. आहे. त्यांच्या हमी पत्रामुळे वनविभागात एकच खळबळ उडाली आहे. विभागाच्या कार्यालयासमोर दि. २८ मे २०२४ पासून वन कामगार उपोषणाला बसले होते हे विशेष. महासंघाच्या लेटरहेडवर दिलेल्या निवेदनावर बाबू शेळके , मोहन राठोड, शेख नानू शेख चांद, दारासिंग पवार, जनार्दन गिरी, उत्तम मिराशे, बळीराम आडे, विलास चव्हाण, भीमराव चव्हाण, सिताराम राठोड, प्रकाश खंदारे, ताराचंद चव्हाण, भीमराव वाठोरे, बापूराव देशमुखे, परसराम बोचिंगे, भुराजी वागतकर, वामन इंगोले, अशोक कदम यांनी हमीपत्र लिहून मुख्यमंत्र्यांना बळी घेण्याची मागणी कैली आहे. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदनात म्हटले आहे की, या अगोदर कामगारांनी संविधानाने दिलेल्या आंदोलन अधिकाराचा वापर करून शासन व प्रशासन यांना जाग आणण्यासाठी अनेक प्रयत्न केले. ज्याप्रमाणे देवाला नवस बोलून कोंबडी, बोकडचे बळी देऊन देव प्रसन्न होऊन नवस पूर्ण होते अशी भावना भक्ताच्या मनामध्ये असते, हीच भावना वन कामगारांनी शासन व प्रशासन यास प्रसन्न करण्यासाठी आज पर्यंत मागील वर्षापासून संविधानाने दिलेला अधिकार अंतर्गत आंदोलनाची सगळी अस्त्र वापरून झालीत. शेवटी शासन प्रशासनाला कामगारांचा बळी पाहिजे असेल तर ते देण्यास कामगार तयार आहेत.

## » संक्षिप्त...

## गुणवंत विद्यार्थी रहेबर भाटी याचा गुणगौरव



**आर्णी:** जिद्द, चिकाटी आणि परिश्रमाच्या जोरावर आर्णी येथील रहेबर अजगर भाटी याने नीट परीक्षेत ५४४ गुण घेत यश संपादन केले. त्याचा एआयआर रैंक १५००० आहे. या यशाबद्दल त्याचा सत्कार करण्यात आला. शिक्षक के. के. खान, शेरू, अब्रार बेग, आमिन, मोहम्मद अली भाटी, वाईद बैलीम, शमसुदिन भाटी, जाफर मलनस, अफरोज ढुंगे, ग्रामसेवक आमीन बैलीम, असगर भाटी आदींनी त्याचा गौरव केला. रहेबर हा डॉक्टर व्हावा, हे सेवानिवृत्त मुख्याध्यापक असलेले त्याचे आजोबा इस्माईल भाटी यांचे स्वप्न आहे. त्या दिशेने त्याची वाटचाल सुरू आहे. सामान्य कुटुंबातील रहेबरच्या या यशाने आर्णीच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला. या यशाबद्दल त्याचे कौतुक होत आहे.

## रोहीपेट येथील सिमेंट रस्ता उखडला



**घाटंजी** : तालुक्यातील शेवटच्या टोकावर असलेल्या सायफळ ग्रामपंचायतअंतर्गत येणाऱ्या रोहीपेट येथे दोन आठवड्यांपूर्वी बांधण्यात आलेला सिमेंट रस्ता उखडला. यावरून या कामाचा दर्जा कसा होता, हे स्पष्ट होते. रोहीपेट येथे शंभर मीटर रस्त्याचे काम सुरू आहे. संबंधित विभागाचे अधिकारी या कामाकडे फिरकतही नसल्याने कंत्राटदाराची मनमानी सुरू आहे. या कामासाठी अतिशय निकृष्ट साहित्य वापरले जात आहे. सिमेंटच्या दर्जाविषयी देखील साशंकता आहे. रस्त्यावरील गिट्टी उखडत चालली आहे. या रस्ता कामाच्या ठिकाणी माहिती फलक लावलेला नाही. काम कोणत्या विभागाचे आहे, कोण कंत्राटदार आहे, कामाचा कालावधी किती आहे, कामाची अंदाजित किंमत किती आहे, याची माहिती होत नाही. तालुक्याच्या शेवटच्या टोकावर हे गाव असल्याने कुठलाही अधिकारी तिकडे फिरकत नाही. मातीमिश्रित रेती वापरली जात आहे. निकृष्ट कामामुळे या रस्त्याच्या आयुष्यावर प्रश्नचिन्ह लागले आहे. संबंधित विभागाच्या वरिष्ठांनी या प्रकाराकडे लक्ष देण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

## अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज आमंत्रित

**यवतमाळ:** अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी महाडीबीटी प्रणालीवर भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क प्रदाने, राजर्षी शाहु महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती, व्यावसायिक पाठ्यक्रमांशी संलग्न असलेल्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांना विद्यावेतन, व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजना राबविण्यात येतात. या शैक्षणिक वर्षातील या योजनांचे प्रथम वर्षाचे व नुतनीकरणाचे अर्ज भरण्यासाठी महाडीबीटी पोर्टल माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत सुरु करण्यात आलेले आहे. महाविद्यालयांनी शासन निर्णयानुसार संबंधित महाविद्यालयात राबविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमांचे शिक्षण शुल्क मंजुरी, विद्यापीठाद्वारे मंजूर होणाऱ्या इतर शुल्क इत्यादी बाबीची मान्यता संबंधित सक्षम शैक्षणिक विभाग, शासकीय यंत्रणेकडुन करुन घेण्यात यावी. या योजनांचे अर्ज विद्यार्थ्यांनी एनपीसीआय बँक आधारलिंक करुन ऑनलाईल पध्दतीने विहीत कालावधीच्या आत परीपुर्ण भरून कागदपत्रासह महाविद्यालयास सादर करावे. महाविद्यालयांनी नियमानुसार शिष्यवृत्तीस पात्र व परीपुर्ण मुळ टीसीसह असलेले अर्ज ऑनलाईन ३० जून पुर्वी सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण कार्यालयात मंजुरीसाठी सादर करावे, असे आवाहन समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त मंगला मुन ह्या करित आहेत.

## विद्याभवन कॉलेजमध्ये योग दिन साजरा



**यवतमाळ:** विद्याभवन कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च येथे आंतराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी योग आणि प्राणायाम करण्यात आला. योगामुळे आपल्याला मन एकाग्र होण्यासाठी मदत होते. तसेच आपली शारीरिक आणि मानसिक वाढ होण्यासाठी मदत होते, असे प्रतिपादन डॉ. प्रणय कोरे यांनी केले. यावेळी प्राचार्य डॉ. धनंजय गायकवाड, प्रा. चंद्रकांत येटरे, प्रा. अनुप शिरभाते, प्रा. अतुल तायडे, प्रा. शंतनू मुस्तीलवार, ग्रंथपाल दीपक हनवते, प्रा. प्रगती किन्हीकर, प्रा. श्वेता उपलेंचवार, प्रा. विशाखा रुईकर, प्रा. वल्लभी घनसावंत, प्रा. वर्षा खानझोडे, दीप्ती गायधने, हरीष हुकरे, प्रगती तिडके, गजेंद्र कावलकर, किशोरी जाधव, पिंकी कसार आदी उपस्थित होते. नियमित योगा केल्यास आरोग्य सुदृढ राहते. मानसिक ताण-तणाव दूर होतो. एकाग्रता वाढीस लागते. योगा करणे आरोग्या व आनंदासाठी फायदेशीर असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## पोखरी येथील रोहित्र उघडे

**महागाव:** तालुक्यातील पोखरी येथे महावितरणचा कारभार चव्हाट्यावर आला असून तेथील रोहित्र उघडे पडलेले आहेत. यामुळे अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. तसेच ढिसाळ कारभाराने गत पाच दिवसांपासून पोखरी व परिसरातील नागरिक अंधारात आहेत. याकडे वीज वितरण विभागाचे दुर्लक्ष होत आहे. वीज वितरण विभागाच्या दुर्लक्षामुळे पोखरी व परिसरातील नागरिक गत पाच दिवसांपासून अंधारात आहे. येथील रोहित्र उघडे आहे. यामुळे अपघाताला आमंत्रण मिळत असल्याचे बोलले जता आहे. येथे कार्यरत असलेले कर्मचारी, लाईनमन नागरिकांना उद्धटपणाची वागणूक देत आहे. स्वतःच्या मनाप्रमाणे कामे करीत असल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे. वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा व रोहित्र तत्काळ दुरुस्त करून उपयोजना करण्याची मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

# यवतमाळ परिवहन विभागाला मिळाल्या ५ इलेक्ट्रीक बसेस



**यवतमाळ, दि.२२, महासागर प्रतिनिधी:** आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात आता प्रवासही पर्यावरण पूरक होत आहे. त्याकरिता यवतमाळ परिवहन विभागाला ५ इलेक्ट्रीक बसेस उपलब्ध झाल्या असून, आरटीओ पासिंग व इतर प्रक्रिया पूर्ण करून पुढील ३ ते ४ दिवसात इलेक्ट्रीक बसेस मधून प्रवासी वाहतूकीचा मार्ग खुला होणार आहे. यामध्ये अमरावती मार्गावर २ बसेस, नागपूर मार्गावर २ बसेस व अकोला मार्गावर १ बस प्रवासी वाहतूक करणार आहे. यवतमाळ ते अमरावती दरम्यान नव्याने सुरू करण्यात येणाऱ्या १०० टक्के इलेक्ट्रॉनिक वातानुकूलित बससेवेची तपासणी आणि चालकांचे प्रशिक्षण नेर आगारात पार पडले. यामध्ये चालन यंत्र अभियंता नरसिंगराव चव्हाण, विभागीय वाहतूक अधिकारी दादाराव दराडे, तसेच आगर व्यवस्थापक निलेश मोकळकर यांच्या मार्गदर्शनात ही प्रक्रिया राबवण्यात आली. ही बससेवा यवतमाळहून सुरू होऊन अमरावतीकडे जाणार असून, नेर हे मध्यवर्ती थांबा असल्याने येथील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

# 'त्या' विधेयकाला लोक तांत्रिक राष्ट्र निर्माण अभियानाचा विरोध

- राज्यभर घेणार जनजागृती सभा

**यवतमाळ, दि.२२, महासागर प्रतिनिधी:** राज्य शासनाने जन सुरक्षा विधेयक लागू करण्यासंदर्भात निर्णय घेण्याची तयारी चालविली असून या विधेयकाला संपूर्ण महाराष्ट्रातून प्रचंड विरोध होत आहे राज्य शासनाने जन सुरक्षा विधेयक आणले तर ते संविधानाच्या काही कलमांवर अन्याय करणारे ठरणार असून यामुळे नागरिकांचा अधिकार देखील संपुष्टात येणार आहे त्यामुळे या कायद्याला संपूर्ण महाराष्ट्रात विरोध केल्या जात असून या कायद्याविषयी संपूर्ण राज्यात जनजागृती करण्यासाठी लोक तांत्रिक राष्ट्र निर्माण अभियानाने सुरुवात केली असल्याचे लोक तांत्रिक राष्ट्र निर्माण अभियानाचे संयोजक गोविंद चव्हाण यांनी आज पत्रकार परिषदेत सांगितले प्रशासनाला आपला आणि परका असा दुजाभाव करणारा आणि भ्रष्टाचाराला वाव देणारा हा कायदा असल्याने यावर आलेल्या आक्षेपाचा विचार करून हा कायदा तात्काळ रद्द करावा अशी मागणीच या निमित्ताने राष्ट्रीय संयोजक लोक तांत्रिक राष्ट्र निर्माण अभियान यांच्याकडून केल्या गेली आहे आज झालेल्या पत्रकार परिषदेला गोविंद चव्हाण, सामाजिक कार्यकर्ते प्रमोद कांबळे, जयंत दिवाण, उत्तमराव खंदारे, निलेश राठी यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

# 'धरती आबा' अभियान शिबिर उत्साहात

**यवतमाळ, दि.२२, महासागर प्रतिनिधी:** जनजातीय गौरव वर्ष-२०२५ निमित्त आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी 'घरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान' या योजनांच्या माध्यमातून आदिवासी बांधवांना सक्षम बनवण्यासाठी केंद्र सरकारकडून विविध उपाययोजना राबवण्यात येत आहेत. या अंतर्गत १५ जून ते ३० जून या कालावधीत प्रत्येक तालुक्यात शिबिर आयोजीत केले जात आहे. विरखेड येथील ग्रामपंचायत प्रांगणात दि. १८ जून रोजी या संबंधीचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच गजानन पांडे उपस्थित होते, तर प्रमुख अतिथी म्हणून निवासी नायब तहसीलदार दिलीप बदकी, गटविकास अधिकारी पद्माकर मडावी, आदिवासी प्रकल्प विभाग पांढरकवडाचे सुनिल भटकर, तालुका पुरवठा अधिकारी निलेश गाढवे, बाजार समिती संचालक विवेक परडखे, पोलिस पाटील सुधाकर चौधरी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी उपक्रमाची माहिती देऊन आदिवासी विभागाच्या योजना मिळण्याकरीता ऑनलाइन अर्ज करावे याबाबत मार्गदर्शन केले. या उपक्रमांतर्गत धरती आबा अभियान आणि धरती आबा कर्मयोगी या माध्यमातून अनेक क्षेत्रातील शासकीय सेवा थेट गावांमध्ये उपलब्ध करून दिल्या गेल्या. कार्यक्रमाचे संचालन शिक्षक मुकेश सोनवने यांनी केले. प्रास्ताविक गटविकास अधिकारी पद्माकर मडावी तर आभार मंडळ अधिकारी प्रफुल घोडे यांनी केले. यावेळी तलाठी वर्षा मस्के, ग्रामपंचायत अधिकारी अजय ठाकरे, कृषी सहाय्यक निलेश दाभेरे, तलाठी निखील सुने, सलिम हुसेन, महसुल सहाव्यक मंगला तिडके, पुरवठा निरीक्षक सुष्मिता फुलके, महसुल सहाय्यक संचित राऊत, आरोम्य सेवक साहिल पांगरे, आरोग्य सेवक दिनेश जाधव आदी उपस्थित होते.

# माजी सैनिकाचा मुलगा झाला भारतीय नौदलात सब लेफ्टनंट

**नेर, दि.२२, महासागर प्रतिनिधी:** तालुक्यातील परजना गावातील माजी सैनिक सध्या ग्रामसेवक म्हणून कार्यरत असलेले विनोद नाईक यांचे सुपुत्र सुशांत विनोद नाईक याची भारतीय नौदलामध्ये सब लेफ्टनंट पदावर निवड झाली आहे. त्यांच्या या यशामुळे संपूर्ण तालुक्यात आनंदाचे वातावरण असून, मित्र मंडळीतर्फे एकत्र येत मोठ्या उत्साहात गौरव सोहळा गुरुवारी स्वागत मंगल कार्यालय येथे पार पडला आहे.

या कौतुक सोहळ्याच्या कार्यक्रमांच्या अध्यक्षस्थानी मोहन जोशी होते. तर प्रमुख अतिथी म्हणून ठाणेदार अनिल बेहरानी, माजी सभापती भाऊराव ढवळे, सत्कार मूर्ती सुशांत विनोद नाईक त्याचे माजी सैनिक विनोद नाईक, आई लक्ष्मी नाईक, राजेश नाईक उपथित होते. या गौरव समारंभात राजकीय संघटना, माजी सैनिकाच्या मुलाची सब लेफ्टनंटपदी निवड झाल्याने सत्कार करण्यात आला. ग्रामसेवक संघटना, शाळेतील शिक्षक, विद्यार्थी, युवक मंडळे, विविध संस्था आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

यावेळी सब लेफ्टनंट झालेल्या सुशांत नाईक याचा सत्कार करण्यात आला. यावेळी कार्यक्रमात बोलताना, माजी सभापती भाऊराव ढवळे म्हणाले की, सुशांतच्या यशाचा गौरव करत त्यांच्या कुटुंबाचा आदर्श उल्लेख केला. 'शिस्त,मेहनत आणि देशभक्ती हीच त्यांच्या यशामागील गुरुकिल्ली आहे, आज त्याच्या डोळ्यात फक्त यशाचा आनंद नाही. तर जबाबदारीची जाणीव आहे. आई-वडिलांच्या डोळ्यात आनंदाश्रू आहेत आणि आपल्या गावाच्या, शाळेच्या, तालुक्याच्या प्रत्येक माणसाच्या हृदयात अभिमान आहे. असे मत यावेळी त्यांनी व्यक्त केले.

शेवटी अध्यक्षीय भाषणात मोहन जोशी म्हणाले की, सुशांतने फक्त स्वतःच्या कुटुंबाचा नव्हे. तर संपूर्ण गावाचा आणि तालुक्याचा मान वाढवला आहे.

आजचा गौरव सोहळा ही केवळ सत्काराची औपचारिकता नही, तर आमचं कृतज्ञतेचं प्रतीक आहे. कारण अशा युवकांकडून प्रेरणा घेऊन आपल्या नव्या पिढीला देशसेवा, शिस्त, कष्ट आणि प्रामाणिकपणाचा आदर्श मिळतो. यावेळी मंचावर उपस्थित मान्यवरानी देखील सुशांतचे कौतुक केले. त्याच्या निवडीमुळे परजना गावासह संपूर्ण नेर तालुक्याचे नाव उज्ज्वल झाले आहे. यशस्वी युक्कांचे प्रेरणादायी उदाहरण म्हणून त्याच्याकडे पाहिले जात आहे.

यावेळी शहरातील काही सामाजिक संघटना कडून सुशांतचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील आहे यांनी केले तर कार्यक्रम प्रास्ताविक गणेश मेंढे यांनी केले.

## कवायत मैदानावर पोलिसांनी केला योगा



**यवतमाळ:** 'योगा फॉर वन अर्थ वन हेल्थ' ही या वर्षासाठी संकल्पना साकारण्यासाठी पोलिस प्रशासन, आर्ट ऑफ लिव्हिंग व पतंजली योग समिती यांनी आयोजित केलेल्या योगा अभ्यास शिबिरासाठी पोलिस विभागातील अधिकारी व कर्मचारी व नागरिकांचा प्रतिसाद मिळाला. पोलिस दलातील कर्मचाऱ्यांचे आरोग्य सुस्थितीत ठेवण्यासाठी पळसवाडी पोलिस कवायत मैदानात योगा शिबिर आयोजित केले होते. या शिबिरासाठी भाप्रसे रविकांत, अपर पोलिस अधीक्षक पीयूष जगताप, वाहतूक शाखेचे पोलिस निरीक्षक ज्ञानोबा देवकते यांच्या पुढाकारातून आयोजन होते. शिबिरात केंद्र सरकारच्या प्रोटोकॉलप्रमाणे योग शिबिराचे मार्गदर्शक संजय चाफले, डॉ. प्रमोद यादगिरवार यांनी गजानन तोटे, अवंतिका कुबडे व आर्या तोटे यांच्या सहकार्याने प्रात्यक्षिक सादर करून योगासने, प्राणायाम, ध्यान व शांतिपीठ करून घेतले. अपर पोलीस अधीक्षक पीयूष जगताप यांनी योगाभ्यासकांना संकल्प शपथ दिली. यावेळी पोलिस दलातील अधिकारी, कर्मचारी व नागरिक सहभागी झाले होते.

: आरएनआय रजिष्ट्रेशन क्रमांक :
-२०१०/३५७९९-
महासागर यवतमाळ
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्णा तन्मुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर-१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, बस स्टँड चौक, होटल प्रकाश जवळ, यवतमाळ येथे प्रकाशित केले. संपादक-श्रीकृष्ण तनमुखदास चांडक मुख्य कार्यालय पोन-०७१२-२७६७६२८-९९२२९७००२३ स्थानिक संपादक-रघुवीरसिंह चौहान फोन-९४२३४३३२४४ (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांचेवर राहिल.)

